①

**प्रेस नोट** अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

दि.०३.०१.२०१९

आलोसे श्री.भरत धुडकु पाटील, मुख्याध्यापक व आलोसे श्री.संजय श्रीकृष्ण कुलकर्णी, कनिष्ठ लिपीक, दोन्ही नेमणुक पी.एम.मुंदडे माध्यमिक विदयालय, पिंप्राळा, जळगांव यांना ५०००/–रु.ची लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव यांची कारवाई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | | जळगांव |
| २ | गुन्हा नोंद कंमाक | | रामानंद नगर पोलीस स्टेशन भाग ६ गुरनं ३००८/२०१९ |
| ३ | कलम | | भ्रष्टाचार प्रतिबंधक (सुधारीत) अधिनियम सन २०१८ चे कलम ७ व ७ अ प्रमाणे |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | | १.श्री.भरत धुडकु पाटील, वय.५७, व्यवसाय नोकरी, मुख्याध्यापक, पी.एम. मुंदडे माध्यमिक विदयालय, पिंप्राळा, जळगांव रा.प्लॉट नं.२७, गट नं.०८, शिवराणा नगर, पिंप्राळा, जळगांव.<br>२.श्री.संजय श्रीकृष्ण कुलकर्णी, वय.५१, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ लिपीक, पी.एम.मुंदडे माध्यमिक विदयालय, पिंप्राळा, जळगांव रा.गट नं.१८८ प्लॉट नं. १२ श्रीमंगलमुर्ती नगर, पिंप्राळा, जळगांव. |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | | तडजोडीअंती ५,०००/–रु. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | | ५०००/– रुपये त्यात २०००/– रुपये दराची ०१ नोट व ५००/– रु दराच्या ०६ नोटा अ.पा.लावलेल्या. |
| ७ | थोडक्यात माहीती | | यातील तक्रारदार या यापुर्वी पी.एम.मुंदडे माध्यमिक विदयालय, जळगांव येथे शिक्षिका म्हणुन नोकरीस होत्या. शासकिय धोरणानुसार तक्रारदार यांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने अतिरिक्त ठरवुन प.नं.लुंकड माध्य. विदया., जळगांव येथे त्यांचे समायोजन केले. त्यानुसार तक्रारदार या सध्या प.न.लुंकड माध्य.विदया.जळगांव शाळेत नेमणुकीस आहे. तक्रारदार यांना प. नं.लुंकड माध्य.विदयालय, जळगांव या शाळेने सेवापुस्तक, भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या तसेच वैयक्तीक फाईल सादर करण्याबाबत कळविले होते.<br>सदर दस्तऐवज तक्रारदार यांना मिळावे म्हणुन त्यांनी पी.एम.मुंदडे माध्यमिक विदयालयाचे मुख्याध्यापक श्री.भरत पाटील यांना लेखी अर्ज दिला होता. व त्यांच्याकडे सदर बाबत समक्ष विनंती केली असता त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की, तुम्हाला तुमचे सेवापुस्तक, भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या तसेच वैयक्तीक फाईल हवी असल्यास त्यासाठी १०,०००/– रुपये दयावे लागतील अन्यथा नमुद दस्तऐवज तुम्हाला मिळणार नाहीत असे सांगितले होते. त्यामुळे तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव यांच्याकडे दि.०२.०१.२०१९ रोजी सविस्तर तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची दि.०३.०१.२०१९ रोजी पडताळणी केली असता मुख्याध्यापक श्री.भरत पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडुन तडजोडीअंती ५,०००/– रुपयांची लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम कनिष्ठ लिपीक श्री.संजय कुलकर्णी यांच्याकडे देण्यास सांगितले त्यास कनिष्ठ लिपीक श्री.संजय कुलकर्णी यांनी होकार दर्शवुन त्यांना सदर लाचेची रक्कम तक्रारदार यांच्याकडुन स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता:– लाप्रवि.जळगांव कार्यालय

संकेतस्थळ:– dyspacbjalgaon@gmail.com

ऑन लाईन तक्रार/ॲप्लीकेशन:– acbmaharastra.nct

टोल फ्री कंमाक:– १०६४

दुरध्वनी कंमाक:– ०२५७,२२३५४७७

व्हॉट्सअॅप कंमाक:– ९६०७५५६५५६

(जी.एम.ठाकुर)
पोलिस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगाव